सत्यमेव जयते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/CET/प्रवेशपत्र/६२९० दिनांक: १७/०९/२०२५

## महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणानुसार सन २०२५-२६ करिता बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम -सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) संदर्भात

## महत्वाची सूचना

सन २०२५-२६ करिता महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थांमधून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देण्यासंदर्भातील योजनेच्या लाभासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी बार्टी, पुणे मार्फत सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येत आहे. या करिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून त्या त्या संस्थानुसार घेण्यात येणाऱ्या योजनेच्या लाभासाठी दिनांक ३०/०८/२०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते.

त्यानुसार सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) बाबत सविस्तर वेळापत्रक तसेच प्रवेशपत्र (Admit card) बाबतची माहिती दिनांक १०/०९/२०२५ रोजी बार्टी संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

दिनांक ११/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या घोषणापत्रकानुसार दिनांक १४/०९/२०२५ व दिनांक १५/०९/२०२५ रोजी होणाऱ्या संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम -सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) पुढे ढकलण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने **संघ लोकसेवा आयोग – नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) सोमवार दिनांक २९/०९/२०२५ रोजी व मंगळवार दिनांक ३०/०९/२०२५ रोजी आयोजित करण्यात येणार आहे** याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत प्रवेशपत्र (Admit card) ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या Application Portal लिंक वर उपलब्ध करून देण्यात येईल.

स्वाक्षरी/-

(सुनील वारे)

**महासंचालक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा सदस्य, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती.**